# Maharashtra Board Class 10 Sanskrit Amod Notes Chapter 7 संस्कृतनाट्यस्तबकः


## संस्कृतनाट्यस्तबकः Summary in Marathi

प्रथमं पुष्पम्।

प्रस्तावना :

कालिदास हा संस्कृत-साहित्यातील अद्वितीय कवी व नाटककार म्हणून ओळखला जातो. त्याची नाटके, काव्य हे वेद, महाभारत व पुराणे यांवर आधारित आहे. मूल्याधिष्ठित भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब कालिदासाच्या रचनांमधून दिसून येते. केवळ भारतातच नव्हे, तर भारताबाहेरही कालिदासाच्या रचना प्रसिद्ध व रंजक मानल्या जातात.

खालील परिच्छेद हा कालिदासाच्या 'अभिज्ञानशाकुन्तलम्' या प्रसिद्ध नाटकातील पहिल्या अंकाचा भाग आहे. येथे नाटकाचा नायक दुष्यंत हरिणाची शिकार करायला निघालेला असतो. तेव्हा तपस्वी वैखानस आश्रमातील प्राण्यांना अभय देण्यासाठी त्याला विनंती करतात, राजा तपस्वींच्या शब्दांना मान देतो व बाण मागे घेतो.



अनुवादः

(त्यानंतर वैखानस व इतर तपस्वी प्रवेश करतात.)

- वैखानस – (राजाला थांबवून) हे राजा! हे आश्रमातील (निष्पाप) हरिण आहे. (याचा वध केला जाऊ नये) याला मारु नये.
  बाण त्वरित मागे घ्यावा. राजांचे शस्त्र हे त्रासलेल्या लोकांच्या संरक्षणासाठी आहे, निष्पापांवर प्रहार करण्यासाठी नव्हे. (निरागसांना मारण्यासाठी नव्हे.)
- दुष्यंत – हा बाण मागे घेतला आहे. (सांगितल्याप्रमाणे करतो.)
- वैखानस – हे राजा! आम्ही यज्ञाकरिता समिधा गोळा करण्यासाठी निघालो आहोत. हा कुलपती कण्वांचा मालिनी तीरावरील आश्रम दिसतो आहे. येथे प्रवेश करून अतिथियोग्य सत्काराचा लाभ घ्या.
- दुष्यन्त – आपण तपस्व्यांना त्रास देणे योग्य नाही (त्यांचे वातावरण भंग करणे योग्य नाही) इथेच रच थांबव, तोवर मी उतरतो.
- सारथी – लगाम धरले आहेत. औक्षवंत राजाने उतरावे.
- दुष्यन्त – (उतरून) आश्रमात प्रवेश करताना वेष साधा असावा. तेव्हा तू हे घे. (सारथ्याला अलंकार व धनुष्य देऊन.) हे सारथी जोवर मी तपस्वीजनांचे आलोकन करून परततो, तोवर घोड्यांच्या पाठीला पाणी लाव. (त्यांना स्वच्छ कर.)
- सारथी – बरे. (असे म्हणून जातो.)

द्वितीयं पुष्यम्।

प्रस्तावना :

शूद्रकविरचित ‘मृच्छकटिकम्’ हे निर्धन ब्राह्मण चारुदत्त व चतुर वसंतसेना यांच्या प्रेमावर आधारित असलेले सामाजिक नाटक आहे. या मुख्य कथानकाला शर्विलक-मदनिका यांची प्रेमकथा व राज्यक्रांती या उपकथानकांची जोड लाभली आहे.

हे नाटक वास्तववादी असून येथे समाजजीवनाला उत्तम प्रकारे चित्रित करण्यात आले आहे. खालील परिच्छेद हा नाटकाच्या सहाव्या अंकातून उद्धृत करण्यात आला आहे. चारुदत्ताचा मुलगा सोन्याच्या गाडीसाठी रडून आक्रोश करतो परंतु गरीब चारुदत्ताला ती सोन्याची गाडी देणे साहजिकच जमत नाही त्यानंतर वसंतसेना त्या मुलाचे रडणे पाहून स्वतःचे सोन्याचे अलंकार देते व त्यातून सोन्याची गाडी तयार कर असे सांगते.

https://www.evidyarthi.in/



अनुवादः

रदनिका – ये बाळा! आपण गाडीबरोबर खेळूया.

- बाळ – (व्याकूळ होऊन), रदनिके! का बरं मला ही मातीची गाडी (देत आहेस)? मला तीच सोन्याची गाडी दे.
- रदनिका – (दुःखाने नि:श्वास टाकत) अरे बाळा! (आता) आपले कोठे सोन्याचे व्यवहार (असणार)? जेव्हा तुझे वडील (पुन्हा) श्रीमंत होतील तेव्हा सोन्याच्या गाडीने खेळशील. (स्वत:ला) तोपर्यंत, मी याला खेळविते. (अन्यथा) मी वसंतसेनेकडे जाते. (वसंतसेनेकडे जाऊन) तुम्हाला माझा नमस्कार.
- वसंतसेना – रदनिके! तुझे स्वागत असो. (पण) हे लहान मूल कोणाचे? अलंकारहीन शरीर असतानाही चंद्राप्रमाणे (सुंदर) चेहरा असणारा हा माझे हृदय आनंदित करतो आहे.
- रदनिका – हा तर आर्य चारुदत्ताचा मुलगा रोहसेन आहे.
- वसंतसेना – (दोन्ही हात पसरवून) ये माझ्या बाळा! (खरोखर) वडिलांचेच रूप अनुसरले आहे. (वडिलांसारखाच आहे.) पण, हा कशासाठी रडतो आहे?
- रदनिका – ह्य शेजारच्या मुलाच्या सोन्याच्या गाडीबरोबर खेळत होता. थोड्या वेळाने त्याने ती (गाडी) घेतली. त्यानंतर त्याला ती (गाडी) हवी होती. म्हणून मी ही मातीची गाडी (त्याला) बनवून दिली. यानंतरही तो म्हणत आहे; ‘रदनिका! ही मातीची गाडी मला कशाला (देतेस)? मला तीच सोन्याची गाडी दे.’
- वसंतसेना – अरेरे! काय हे दुर्दैव! रडू नकोस (बाळा) हे (सोन्याचे) अलंकार घे व तुझ्यासाठी सोन्याची गाडी घडव.
  (रदनिका त्या लहान मुलाला घेऊन जाते.)

तृतीयं पुष्पम्।

प्रस्तावना :

भारतीय आद्य नाटककार 'भास' विरचित कर्णभारम् हे एकांकी संस्कृत नाटक आहे. कर्णभारम् हे मुख्यत्वे भारतीय महाकाव्य महाभारतातील, एका भागाचे वेगळ्या दृष्टिकोनातून केलेले पुनर्कथन आहे. कर्णभारम् ही संभाव्य शोकांतिका आहे. खालील परिच्छेदात, इंद्र हा याचकाच्या रूपात कर्णासमोर येतो व अखेर दानशूर कर्णाकडून जन्मजात असलेली कवचकुंडले घेण्यात यशस्वी ठरतो.



अनुवादः

(नंतर याचक रूपात शक्र प्रवेश करतो.)

- शक्र : (कर्णाजवळ जाऊन) अरे कर्णा, मला मोठी भिक्षा हवी आहे.
- कर्ण : अझे स्वामी ! मला खूप आनंद झाला आहे. मी तुम्हांला नमस्कार करतो.
- शक्र: (स्वत:ला) आता मी काय बोलावे? जर मी 'दीर्घायु हो' असे बोललो तर हा दीर्घायु होईल, जर मी (काहीच) नाही बोललो तर हा मला मूर्ख समजेल. तेव्हा, हे दोन्ही सोडून काय बरे बोलावे? असो. लक्षात आले. (मोठ्याने) कर्णा, सूर्याप्रमाणे, चंद्राप्रमाणे, हिमालयाप्रमाणे व समुद्राप्रमाणे तुझे यश (चिरंतन) राहो.
- कर्ण : स्वामी! तुम्ही दीर्घायू हो, असे का नाही म्हणालात? अन्यथा असो, जे बोलला आहात (जो आशीर्वाद दिला आहे) तेच योग्य असेल, कारण, मर्त्य शरीरामध्ये (केवळ) सद्‌गुणच शेवटपर्यंत राहतात. स्वामी, तुम्हांला काय हवे आहे? (तुम्ही कशाची इच्छा करत आहात?) मी आपल्याला काय देऊ?
- शक्र: मला मोठी भिक्षा हवी आहे.
- कर्ण : मी तुम्हाला सर्वात मोठी भिक्षा (महत्तम दान) देतो. मी आपणाला हजार गायी देतो.
- शक्र : हजार गायी? (पण) मी दूध क्वचित पितो. मला त्यांची इच्छा नाही.
- कर्ण: आपणास (त्यांची) इच्छा नाही. (तर मग) आपणांस पुष्कळ सोने देईन.
- शक्र: ते तर (केवळ) घेऊन जाता येईल. कर्णा, मला त्याची (सोन्याची) इच्छा नाही.
- कर्ण: मग तुम्हाला पृथ्वी जिंकून ती देईन.
- शक्र: पृथ्वी (घेऊन) मी काय करु? मला (तिची) इच्छा नाही.

https://www.evidyarthi.in/

- कर्ण: किंवा माझे मस्तकच तुम्हाला देईन.
- शक्र: असे बोलू नकोस.
- कर्ण: घाबरु नका. घाबरु नका. हे पण ऐका, जन्मजात असलेले हे कवच कुंडलांसकट मी देईन.
- शक्र: (आनंदी होऊन) कृपया दे.

शब्दार्थाः

1. मृगः – deer – हरिण
2. न हन्तव्यः – should not be killed – मारले जाऊ नये
3. सायक: – arrow – बाण
4. तापसौ – hermits – तपस्वी
5. धृताः प्रग्राः – bridles are held – लगाम धरले आहेत
6. वाजिनः – horses – घोडे
7. आभरणानि – ornaments – अलंकार
8. विनीतवेषेण – with humble attire – साध्या वेषात
9. समिदाहरणाय – to collect wood for sacrifice – यज्ञासाठी समिधा गोळा करण्यासाठी
10. आर्तत्राणाय – for protecting the oppressed/afflicted- हतबलांच्या रक्षणासाठी
11. अपावर्ते – I return – मी परततो
12. प्रतिगृह्यताम् – may it be accepted – स्वीकार केला जावा
13. अवरुध्य – stopping – अडवून
14. आशु – quickly – झटकन
15. अनागसि- for the destruction – निरागसांना
16. प्रहर्तुम् – of the innocent – मारण्यासाठी
17. तपोवन – no trouble for – तपोवनात राहणाऱ्यांना
18. निवासिनाम् उपरोध: मा भूत् – the hermits – व्यत्यय होऊ नये
19. यावत् अवतरामि – till I get down – तोपर्यंत/तोवर मी उतरतो
20. आर्द्रपृष्ठाः क्रियन्ताम् – let (it) be watered – पाण्याने स्वच्छ केले जावेत
21. वत्स – child – बाळ
22. प्रतिवेशिक – neighbour – शेजारी
23. दारक: – child – मूल/ बाळ
24. अनलकृत – body without – अलंकारहीन शरीर
25. शरीरः – ornaments
26. सौवर्ण शकटिकाम् – golden cart – सोन्याची गाडी
27. अनुकृतं रूपम् – followed the form – रूप अनुसरले आहे
28. शकटिकया – with a cart – गाडीबरोबर
29. ऋद्ध्या – with richness – श्रीमंतीने
30. विनोदयामि – amuse, entertain – खेळविते
31. घटय – you make तू घडव.
32. सकरुणम् – crying pitiably – रडत रडत
33. सनिर्वेदम् – wearily – त्रासून / वेदनेने
34. समीपम् उपसर्पिष्यामि – shall approach – जवळ नेते

35. मच्छिरः – my head – माझे मस्तक/शिर
36. क्षीरम् – milk – दूध –
37. गोसहस्रम् – thousand cows – हजार गायी
38. मुहूर्तकम् – rarely – क्वचित
39. महत्तराम् – most big – सर्वात मोठी
40. न भेतव्यम् – don't be scared – घाबरु नका
41. धरन्ते – remain – राहतात
42. प्रदास्ये – I will give – मी देईन
43. उपगम्य – approaching – जवळ जाऊन
44. परिहत्य – leaving – सोडून
45. उभयम् – both – दोन्ही
46. अविहा – don't say so – असे बोलू नको
47. दृढं प्रीत: – I am very happy – खूप आनंदित
48. अस्मि – झालो आहे

https://www.evidyarthi.in/